वाचले :-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारीत तरतूदी.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे २०२१.

३. पदोन्नती समिती सभा दिनांक ०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.

४. मा.आयुक्तसो यांचा दिनांक- ०८/१०/२०२४ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/०४/कावि/१४६१/२०२४
दिनांक ०८/१०/२०२४

**विषय :- ' क्रिडा पर्यवेक्षक ' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ' क्रिडा पर्यवेक्षक ' अभिनामाची रिक्त असणारी पदे पदोन्नतीने भरण्याकरीता दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती.

सदरच्या समितीने शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे २०२१ अन्वये दिलेले निर्देश विचारात घेवून पदोन्नतीपूर्व क्रिडा शिक्षक पदावरील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, गोपनीय अहवाल, सेवाजेष्ठता, मत्ता व दायित्व आणि शिस्तभंग विषयक कारवाई इ. सेवाविषयक तपशील पडताळून रिक्त असणा-या पदावर खालील नमूद क्रिडा शिक्षक पदावरील कर्मचा-यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार क्रिडा पर्यवेक्षक अभिनामाच्या पदावर पे लेवल एस-१४ वेतनश्रेणी र.रु.३८६०० - १२२८०० या वेतनश्रेणीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र | क्रिडा शिक्षक कर्मचा-यांचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | श्री.कडूस अरुण शंकर | ज्येष्ठतेनुसार |
| २. | श्री.जगताप अनिल काशिनाथ | ज्येष्ठतेनुसार |
| ३. | श्री.तिकोने गोरक्ष रंगनाथ | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त नमूद बाबी विचारात घेता, मी आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा

याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७६/२०२१, रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०९०९ / २०२१ मध्ये होणा-या अंतीम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त नमूद कर्मचा-यांना ज्येष्ठतेनुसार 'क्रिडा पर्यवेक्षक' या अभिनामाचे पदावर पे लेवल एस-१४ वेतनश्रेणी र.रु.३८६०० - १२२८०० या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तूतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधित कर्मचा-यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी४११०१८**

प्रति,
श्री/श्रीमती --------------------------
प्रत-
१. लेखा विभाग २. लेखापरिक्षण विभाग ३. प्रशासन टेबल क्रमांक ७, ९, १०, १२, १४, संगणक कक्ष
४. पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ ५. पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी सेवकांची सह.पतसंस्था
६. सर्व संबंधित विभाग--------------------

प्र. सहाय्यक आयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८